# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## स्वच्छता ही सेवा अंतर्गत इंटरनॅशनल कोस्टल क्लीनअप दिवस निमित्ताने मेगा बीच क्लीन ड्राईव्ह संपन्न

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी दिनांक 2 ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त पूर्वतयारी म्हणून स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी स्वच्छता ही सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे तसेच यावर्षी स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता ही अभियान राबविण्यात येतो. या अभियानाचा एक भाग म्हणून स्वच्छता ही सेवा अंतर्गत इंटरनॅशनल कोस्टल क्लीनअप दिवस निमिताने दिनांक 21 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 8 वाजता उत्तन बीच आणि वेलकंनी बीच येथे मेगा बीच क्लीन ड्राईव्ह हा उपक्रम राबविणे बाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी निर्देश दिले होते. सदर मनपा कर्मचारी, NGO व शहरातील नागरिकांनी मिळून स्वच्छता ही सेवा यासाठी श्रमदान केले तसेच स्वच्छता ही सेवा या कार्यक्रम पार पाडण्यासाठी विविध अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी उकृष्टरित्या पार पाडल्या आहेत.

21 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 8.00 वाजता स्वच्छतेची शपथ घेऊन उत्तन आणि वेलांकनी बीच साफसफाईला सुरुवात झाली.मिरा भाईंदर शहरातील 11 NGO चे प्रतिनिधी, 10 महाविद्यालय आणि 9 शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षक तसेच अग्निशमन दलाचेअधिकारी कर्मचारी, पत्रकार तसेच मिरा भाईंदर महानगर पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते उत्तन समुद्रकिनाऱ्यावर 1800 तसेच वेलकनी समुद्रकिनाऱ्यावर 1200 असे एकूण 3000 नागरिक या मेगा बीच क्लीनअप ड्राईव्ह महिमेत सहभागी झाले. या मोहिमेत मिस अर्थ असलेली गौरी घोटणकर आणि हिंदी चित्रपट सृष्टीत ला प्रसिद्ध गायक कुणाल पंडित देखील हजर होते. सकाळी 8 वाजता स्वच्छतेची शपथ घेऊन सुरू झालेला उपक्रमाची सांगता उत्तन नी वेलकनी दोन्ही समुद्रकिनारा सफाईने झाली. उत्तन समुद्रकिनाऱ्यावर 22.50 टन व वेलंकणी समुद्रकिनाऱ्यावर 15 टन कचरा गोळा करून महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पावर पाठवण्यात आला. मिरा भाईंदर महानगरपालिकेने बीच क्लीनअप नंतर अल्पोपहारची व्यवस्था केली होती. मिरा भाईंदर महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी या उपक्रमाविषयी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले मिरा भाईंदर शहरातल्या नागरिकांमध्ये स्वच्छतेची जनजागृती व्हावी शहरे आणि समुद्र किनार प्लास्टिक कचरा मुक्त व्हावा यासाठी आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर उपायुक्त संजय दोंदे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सिस्टीम मॅनेजर तथा जनसंपर्क अधिकारी राज घरत, सहाय्यक आयुक्त जितेंद्र कांबळे यांच्यासह मिरा भाईंदर महानगर पालिकेचे अधिकारी आणि सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.